******************************************************************************************

# जिल्हा परिषद, गोंदिया

## सामान्य प्रशासन विभाग

जि.प. प्रशासकीय इमारत, आमगांव रोड, गोंदिया 441601

website :- www.zpgondia.gov.in 07182 236425

e-file no :- ZPGON-GAD023(16)/1/2025-ZPG-DY. CEO GEN दिनांक :- 12.03.2025

## जाहिरात

जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत मा. उच्च न्यायालय, महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण नागपूर तसेच कामगार न्यायालय व दिवाणी/फौजदारी/ग्राहक मंच/अति. आयुक्त इत्यादी मध्ये जिल्हा परिषदेच्या वतीने पैरवी करण्याकरीता जिल्हा परिषद पॅनलवर वकील (अधिवक्ता) खालील प्रमाणे अटी व शर्तीवर नियुक्त करण्यासाठी ऑफलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती :-**

१. मा. उच्च न्यायालय/ महाराष्ट्र प्रशाकीय प्राधिकरण नागपूर प्रकरणासाठी निपटारा होईपर्यंत पैरवी केल्यास रुपये **२००००/-प्रती** प्रकरण मानधन व इतर खर्च ५०००/-देण्यात येईल.

२. मा. औद्योगिक न्यायालय भंडारा हयांचे कडील प्रकरणे पाहिल्यास प्रती प्रकरणे संपूर्ण निपटारा होईपर्यंत रुपये **१००००/-** प्रती प्रकरण मानधन व इतर खर्च ५०००/-देण्यात येईल.

३. मा. कामगार/दिवानी/सत्र न्यायालय/जिल्हा ग्राहक मंच/मा. कामगार आयुक्त हयांचेकडील प्रकरणे पाहिल्यास प्रति प्रकरणे संपुर्ण निपटारा होईपर्यंत रुपये **१००००/-प्रती** प्रकरण मानधन व इतर खर्च ५०००/- देण्यात येईल.

४. जिल्हा परिषदेला प्राप्त नोटीसाचे फक्त उत्तर सादर करण्याकरीता रुपये **५०००/-** जि. प. च्या मंजुर दरानुसार प्रती प्रकरण फीस देण्याच्या अटीच्या व शर्तीच्या अधिन राहुन नेमणूक करावयाची आहे.

तसेच मा. न्यायालयामध्ये पैरवीकरण्याकरीता स्थानिक स्तरावरील नोंदनीकृत वकील (अधिवक्ता) यांना प्राधान्य देण्यात येईल.अर्जाचा विहीत नमुना व अटी व शर्ती zpgondia.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

शैक्षणिक अर्हता :- किमान **एल.एल.बी.**

अनुभव :- मा. उच्च न्यायालयात १० वर्ष व स्थानिक न्यायालयात ७ वर्ष कामाचा अनुभव असणे आवश्यक .

अर्ज स्विकारण्याचा दिनांक :- **१५.०३.२०२५ ते १५.०४.२०२५**

अर्ज स्विकारण्याचा संपूर्ण पत्ता :- सामान्य प्रशासन विभाग, जि. प. गोंदिया

| | |
|---|---|
| Signed by<br>Farendra Rupchand Kutirkar<br>Date: 12-03-2025 17:52:57 | Signed by<br>M Muruganantham<br>Date: 13-03-2025 13:02:35 |
| **(फरेंद्र आर. कुतिरकर)**<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)<br>जिल्हा परिषद, गोंदिया<br>***Signed on E-Office*** | **(मुरूगानंथम एम., भा.प्र.से.)**<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, गोंदिया<br>***Signed on E-Office*** |

## जिल्हा परिषद, गोंदिया

### जिल्हा परिषद स्तरावर जि. प. पॅनलवरील वकील नियुक्तीबाबत भरावयाच्या पदासाठी अर्ज

| अर्जदाराचे स्वत:चा फोटो सांक्षाकित करुन येथे लावने आवश्यक आहे. |
|---|

**प्रति.**

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया.

**विषय :-** अर्ज करीत असलेल्या पदाचे नांव जि. प. पॅनलवरील वकील (अधिवक्ता) पद मा. उच्च न्यायालय/महाराष्ट्र प्रशासन प्राधिकरण नागपूर/मा. कामगार/दिवानी/सत्र न्यायालय/जिल्हा ग्राहक मंच/मा. कामगार आयुक्त न्यायालयाचे प्रकरणे हाताळण्यासाठी.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे संपूर्ण नांव | | | (आडनांव स्वत:चे नांव वडीलाचे नांव) | | |
| २ | अर्जदाराचे संपूर्ण पत्ता | | | | | |
| ३ | अर्जदार पुरुष/ स्त्री आहे | | | | | |
| ४ | पत्र व्यवहाराचा पत्ता/कार्यालयाचा पत्ता | | | | | |
| ५ | कायमचा पत्ता | | | | | |
| ६ | ई- मेल (पत्र व्यवहार करण्यासाठी आवश्यक) | | | | | |
| ७ | दुरध्वनी क्रमांक | | | | | |
| ८ | मोबाईल क्रमांक | | | | | |
| ९ | जात व पोटजात | | | | | |
| १० | अर्जदाराचा वकीली कामाचा न्यायालयीन कामाचा अनुभव/एकुण वर्षे | | | | | |
| ११ | अर्जदाराची जन्म तारीख | | | | | |
| १२ | अर्जदाराची शैक्षणिक अर्हता | | | उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशिल | | |
| | शैक्षणिक पात्रता | परिक्षा मंडळाचे नांव/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्षे | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
| | पदवी | | | | | |
| | पदव्युत्तर पदवी | | | | | |
| | इतर शैक्षणिक अर्हता | | | | | |
| १३ | अर्जासोबत जोडलेली प्रमाणपत्रे | | | | | |
| १४ | नागपूर/गोंदिया येथे वकीलाचे कार्यालय असल्यास ठिकाण | | | | | |
| १५ | बार कॉन्सिल नागपूर/गोंदिया यांचे रजिस्ट्रेशन प्रत/वर्षे | | | | | |
| १६ | अर्जासोबत जोडलेली प्रमाणपत्रे/अनुभव प्रमाणपत्र | | | | | |

मी श्री./श्रीमती------------------------------प्रमाणित करतो/ करते की, वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहिती प्रमाणे सत्य व अचुक आहे. मी प्रमाणीत करतो/करते की अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास अर्ज रद्द करण्यात येईल. तसेच सदर पदावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपातील, निव्वळ मानधन पध्दतीवर असल्याने शासन सेवेत कायम करण्यासाठी हक्क राहणार नाही याची मला पुर्ण पणे जानीव आहे. शासन सेवेत (जि. प.) कायम करण्यासाठी भविष्यात हक्क सांगणार नाही अशी लेखी हमी देत आहे.

स्थळ : स्वाक्षरी
दिनांक : अर्जदारचे नांव

## अटी व शर्ती

१) जिल्हा परिषदेने निर्धारित केल्याप्रमाणे वकील फी व ईतर खर्चाची रक्कम देण्यात येईल. अधिकच्या खर्चाची रक्कम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे वकीलास देय राहील.

२) सर्वच स्तरावरच्या प्रकरणी वकीलांनी सल्ला देणे आवश्यक राहील.

३) जिल्हयातील कोणत्याही न्यायालयातील कोर्ट प्रकरणे हाताळावी लागतील.

४) सर्वच कोर्ट प्रकरणात कोर्ट फी अदायगीबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, गोंदिया यांनी घेतलेला निर्णय अंतीम राहील.

५) कोर्ट प्रकरणी सुनावणीस कोर्टात हजर न झाल्यास अथवा विहीत मुदतीत मुद्देनिहाय उत्तरे दाखल न केल्यास संबंधीत वकीलास जिल्हा परिषद पॅनलवरुन केव्हाही कमी करण्यात येईल. आणि त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

६) कोर्ट प्रकरण प्रगतीचा त्रैमासिक अहवाल जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागास सादर करणे आवश्यक राहील तसेच वेळोवेळी प्रकरणाची/दाव्याची स्थिती कळवावी लागेल.

७) प्रकरण न्यायालयात दाखल झाल्यानंतर व उत्तरे न्यायालयात सादर झाल्यानंतर वकीलांनी त्या प्रकरणात पार्ट पेमेंट मागीतल्यास न्यायालयीन प्रकरणाच्या पुर्ण फी च्या ५०% व ईतर खर्चा चे १००% रक्कम पार्ट पेमेंट म्हणुन मंजुर करता येईल. उर्वरीत वकील फी ची ५०% रक्कम अंतीम निकालानंतर देण्यात येईल.

८) आपली नियुक्ती आदेश निर्गमीत झाल्याचे दिनांकापासुन पुढील एक वर्षाकरीता करण्यात येत आहे. एक वर्ष झाल्यावर आपली न्यायालयीन निर्णयाच्या प्रगतीनुसार मुदतवाढ देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांना राखीव राहील.

९) वरील अटि व शर्ती च्या अधिन राहुन जिल्हा परिषदेच्या पॅनल वरिल वकीलास जिल्हा परिषद, गोंदिया किंवा जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या कोणत्याही विभागाचे विरुध्द प्रकरणे स्विकारता येणार नाही.

१०) भविष्यात गरज भासल्यास पॅनल वरील वकीलांची संख्या वाढविण्याचे किंवा कमी करण्याचे तसेच वकील फी चे दर वाढविण्याचे किंवा कमी करण्याचे अथवा वकीलाची नियुक्त रद्द करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांना राखीव राहतील.

११) प्रकरणात वकील नियुक्त करण्याचे व दर निश्चित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांना असतील.

१२) विशिष्ट प्रकरणात एका वकीलाकडुन प्रकरण / दावा दुसऱ्या वकीलाकडे देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांना राहतील.

१३) वरील सर्व अटी मान्य असल्याचे हमीपत्र द्यावे लागेल.

| | |
|---|---|
| Signed by<br>Farendra Rupchand Kutirkar<br>Date: 07-03-2025 15:58:42 | Signed by<br>M Muruganantham<br>Date: 13-03-2025 13:35:48 |
| **(फरेंद्र आर. कुतिरकर)**<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)<br>जिल्हा परिषद, गोंदिया<br>***Signed on E-Office*** | **(मुरूगानंथम एम., भा.प्र.से.)**<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, गोंदिया<br>***Signed on E-Office*** |